the practice
STRATEGIC COMMUNICATIONS

| PUBLICATION: Lalkar | |
|---|---|
| EDITION: Sangli | DATE: 03/01/2017 |

# १६ एकर केळी पीक क्षेत्रामधून ७०० मे. टन केळी उत्पादित

प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलहि गळे याउक्ति प्रमाणे अथक प्रयत्नातून महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील इटकरे ता. वाळवा येथील नंदकुमार सुभाष पाटील यांनी डोंगरावरती ३० एकर मुरमाड जमीन ओलिताखाली आणून केळी, ऊस, ढबूयासारख्या नगदी पिकाचे आदर्शवत उत्पन्न घेतले आहे.

पाटील हे २००१ सालापासून शेती करत असून पारंपरिक शेतीला फाटा देऊन आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान आत्मसात करून अधिक अधिक उत्पन्न घेण्याचा त्याचा नेहमी कल असतो. म्हणूनच त्यांच्या कार्याची दाखल म्हणून नुकतीच त्याची फळ निर्यातीमध्ये अग्रगण्य असणाऱ्या आय एन आय कँम्नी मार्फत उत्कृष्ठ फळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी दुबई येथे आयोजित केलेल्या अभ्यासदौऱ्यासाठी निवड करण्या आली आहे.

गेली ३ वर्षां पासून ते आय एन आय कँम्नी सोबत काम करत असून या कँम्नीच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी १६ एकर केळी पीक क्षेत्रामधून ७००मे. टन केळी उत्पादित केली आहे त्यातील जवळपास सर्वच केळी निर्यात झाली असून त्यांनी एकरी ४५ मे. टन सरासरी ने उत्पादन घेतले आहे त्यासाठी त्यांना आय एन आय कँम्नीचे बहुमोला मार्गदर्शन लाभले .

इतर शेतकऱ्या प्रमाणे पाटील हे सुद्धा व्यापारी लोकांकडून दरामध्ये होणारी पिळवणूकमुळे त्रस्त होते. मात्र आय एन आय कँम्नी आमचा उत्पादित माल परदेशात पाठवून मालाला यौग्य भाव दिल्यामुळे आर्थिक फायदा होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्याच बरबर त्यांनी इतर अल्पं भूधारक शेतकऱ्यांना सुद्धा आय एन आय कँम्नी सोबत काम करता यावे यासाठी त्यांनी गट शेती कल्पना प्रत्यक्षात राबवून आय एन आय कँम्नी सोबत करार शेती सुरु केली आहे.